Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



# बालबोध पाठमाला

## भाग 2

(मराठी)

डॉ. हुकमचन्द भारिल्ल

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

( श्री टोडरमल ग्रंथमालेचे बावीसावे पुष्प )

# बालबोध पाठमाला भाग २

( श्री वीतराग विज्ञान विद्यापीठ परीक्षा बोर्डाद्वारे निर्धारित )

[ मूळ हिंदीचा मराठी अनुवाद ]

: लेखक व संपादक :

**डॉ. हुकमचन्द भारिल्ल**

शास्त्री, न्यायतीर्थ, साहित्यरत्न एम्. ए., पीएच्. डी.
संयुक्तमंत्री, श्री टोडरमल स्मारक भवन, जयपूर.

: प्रकाशक :

**पण्डित टोडरमल स्मारक ट्रस्ट,**

ए–४, बापूनगर, जयपूर–३०२०१५ (राज.)

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**मराठी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम तीन संस्करण (१९७४ से अध्यावधि) | : | १३ हजार २०० |
| चतुर्थ संस्करण (२ अक्टूबर १९९३) | : | ३ हजार |
| **योग** | : | **१६ हजार २००** |


## विषय-सूची


| क्रम | पाठाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | भगवंताची प्रार्थना | ३ |
| २. | पाप | ७ |
| ३. | कषाय | ११ |
| ४. | सदाचार | १५ |
| ५. | गती | २० |
| ६. | द्रव्य | २५ |
| ७. | भगवान महावीर | ३० |
| ८. | जिनवाणी स्तुती | ३५ |


**मुद्रक :**
जयपुर प्रिंटर्स प्रा. लि.
एम. आई. रोड़
जयपुर

Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

## Thanks & Our Request

This shastra has been kindly donated by Dakshaben Sanghvi, Geneva, Switzerland who has paid for it to be "electronised" and made available on the internet.

Our request to you:

1) Great care has been taken to ensure this electronic version of BalbodhPathmala – Part 2 (Marathi) is a faithful copy of the paper version. However if you find any errors please inform us on rajesh@AtmaDharma.com so that we can make this beautiful work even more accurate.

2) Keep checking the version number of the on-line shastra so that if corrections have been made you can replace your copy with the corrected one.

## Version History

| Version Number | Date | Changes |
|---|---|---|
| 001 | 14 May 2008 | First electronic version |

# पाठ पहिला

# भगवंताची प्रार्थना

वीतराग सर्वज्ञ हितंकर, भविजन की अब पूरो आस ।
ज्ञान भानु का उदय करो मम, मिथ्यातम का होय विनास ॥

जीवों की हम करुणा पालें, झूठ वचन नहीं कहें कदा ।
परधन कबहुँ न हरहूँ स्वामी, ब्रह्मचर्य व्रत रखें सदा ॥

तृष्णा लोभ बढ़े न हमारा, तोष सुधा नित पिया करें ।
श्री जिनधर्म हमारा प्यारा, तिस की सेवा किया करें ॥

दूर भगावें बुरी रीतियाँ, सुखद रीति का करें प्रचार ।
मेल-मिलाप बढावें हम सब, धर्मोन्नति का करें प्रसार ॥

सुख-दु:ख में हम समता धारें, रहें अचल जिमि सदा अटल ।
न्याय-मार्ग को लेश न त्यागें, वृद्धि करें निज आतमबल ॥

अष्ट करम जो दु:ख हेतु हैं, तिनके क्षय का करें उपाय ।
नाम आपका जपें निरंतर, विघ्न शोक सब ही टल जाय ॥


आतम शुद्ध हमारा होवे, पाप मैल नहिं चढ़े कदा ।
विद्या की हो उन्नति हममें, धर्म ज्ञान हू बढ़े सदा ॥

हाथ जोड़कर शीश नवावें, तुमको भविजन खड़े खड़े ।
यह सब पूरो आस हमारी, चरण शरण में आन पड़े ॥



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



# सारांश

ही स्तुती खऱ्या देवाची आहे. जो वीतराग, सर्वज्ञ व हितोपदेशी आहे त्यास खरा देव म्हणतात. जो राग-द्वेषांनी रहित आहे तो वीतराग आहे. आणि जो लोक व अलोकातील संपूर्ण पदार्थांना एकाचवेळी प्रत्यक्ष जाणतो तो सर्वज्ञ होय. आत्महिताचा उपदेश देत असल्यामुळे वीतराग सर्वज्ञाला हितोपदेशी म्हणतात.

भव्यजीव, वीतराग भगवंतांची प्रार्थना करताना सर्वप्रथम हेच म्हणतो की, भगवान् ! मी माझ्या मिथ्यात्वाचा नाश करतो व सम्यग्ज्ञानाची प्राप्ती करतो कारण मिथ्यात्वाचा नाश केल्याशिवाय धर्मांचा प्रारंभच होत नाही !

त्यानंतर हा भव्यजीव आपली भावना प्रगट करीत म्हणतो की, भगवन् ! माझी प्रवृत्ती पाच पापांमध्ये व कषायांमध्ये न जावो ! माझ्याकडून हिंसा न होवो ! असत्य भाषण न होवो !



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

चोरी न होवो ! दुराचार न होवो ! तसेच लोभवश परिग्रहाचा संग्रह न होवो, मनामध्ये सदा संतोष राहो ! माझे हे जीवन नेहमी धर्मसेवेत लागो !

भगवन् ! धर्माच्या नावावर चालणाऱ्या मिथ्यारुढी, गृहीत-मिथ्यात्वादी, मजकडून दूर होवोत ! सामाजिक मिथ्या चाली-रीतीही दूर होवोत. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात उत्तमोत्तम परम्परा निर्माण होवोत ! आम्हा सर्वांमध्ये परस्पर धर्म-प्रेम राहो !

भगवन् ! मी सुखामध्ये हुरळून न जावो आणि दुःखामध्ये गांगरून न जावो ! सुखाचे वेळी व दुःखाचे वेळी माझे धैर्य टिकून राहो ! समता कायम राहो ! माझा व्यवहार नेहमी न्यायाचा होवो ! आणि माझ्या आत्मबलाची वृद्धी होवो !

भगवन् ! आठही कर्म दुःखाचे निमित्त आहेत. कोणतेही अशुभ किंवा शुभ कर्म खऱ्या सुखाचे कारण नाही, म्हणून माझी अशीच प्रवृत्ती राहो की, त्यांचा सहजच नाश होईल. सदासर्वदा आपल्या गुणांचे स्मरण राहो, त्यामुळे सन्मार्गातील सर्वच बाधा आपो-आप दूर होतील !

भगवन् ! माझी दुसरी कोणतीही इच्छा नाही ! माझी एकच भावना आहे माझा आत्मा पवित्र होवो ! मिथ्यात्वादी पापमलाने तो मलीन न होवो ! तसेच लौकिक विद्येच्या उन्नती-बरोबरच आमच्या धर्मज्ञानाची ( तत्त्वज्ञानाची ) निरंतर वाढ होत राहो !

भगवन् ! आम्ही भव्यजीव उभे राहून हात जोडून आपणास नमस्कार करीत आहोत ! आम्ही तर आपल्या चरणाला शरण आलो आहोत, आमची ही मनोभावना अवश्य पूर्ण होवो !

**प्रश्न –**

१. ही प्रार्थना कोणाची आहे ? खरा देव कोणास म्हणतात ?

२. पूर्ण प्रार्थना म्हणा किंवा लिहा.

३. वरील प्रार्थनेचा भावार्थ आपल्या शब्दात लिहा.

४. खालील ओळींचा अर्थ लिहा.

"ज्ञान भानु का उदय करो, मम मिथ्यातम का होय विनास"
"दूर भगावे बुरी रीतियाँ, सुखद रीति का करे प्रचार"
"अष्ट करम जो दुःख हेतु है, जिनके क्षय का करें उपाय"

---

## पाठात आलेली सूत्रात्मक सिद्धांत-वाक्ये

१ जो वीतराग, सर्वज्ञ व हितोपदेशी आहे तोच खरा देव आहे.

२. जो राग-द्वेषांनी रहित आहे तोच वीतराग आहे.

३. जो लोक व अलोकातील संपूर्ण पदार्थांना एकाच वेळी जाणतो तो सर्वज्ञ आहे.

४. आत्महिताचा उपदेश देत असल्यामुळे तो वीतराग सर्वज्ञच हितोपदेशी आहे.

५. मिथ्यात्वाचा नाश केल्याशिवाय धर्माचा प्रारंभ होत नाही.

६. आठही कर्मे दुःखाचे निमित्त आहेत. कोणतेही अशुभ वा शुभ कर्म सुखाचे कारण नाही.

७. ज्ञानी भक्त दुसरी कोणतीही इच्छा करीत नाही. आपला आत्मा पवित्र होवो ही एकच भावना करतो.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ दुसरा | पाप

पुत्र – पिताजी, लोक म्हणतात की, लोभ पापाचा बाप आहे. तर मग लोभ हे सर्वात मोठे पाप असेल ?

पिता – नाही बाळ ! खरे तर असे आहे की, सर्वात मोठे पाप मिथ्यात्व आहे, ज्याला वश होऊन जीव घोर पाप करतो.

पुत्र – पाच पापात तर याचे नाव नाही. त्यांची नावे मला पाठ आहेत. हिंसा, असत्य, चोरी, कुशील आणि परिग्रह.

पिता – ठीक आहे बाळ ! परंतु लोभाचेही नाव तर पापांमध्ये नाही. तरीपण लोभाला वश होऊन लोक पाप करतात म्हणून तर त्याला पापाचा बाप म्हणतात; त्याचप्रमाणे मिथ्यात्व हे तर त्यापेक्षाही भयंकर असे पाप आहे की जे सोडल्याशिवाय संसार-परिभ्रमण सुटतच नाही व दुःखा-पासून जीवाची मुक्ती होत नाही.

पुत्र – ते कसे ?

पिता – विपरीत मान्यतेलाच 'मिथ्यात्व' म्हणतात. जोपर्यंत मान्यताच मिथ्या किंवा विपरीत राहील तोपर्यंत जीव पाप सोडील तरी कसे ?

पुत्र – तर मग असेच ना की, सत्य समजणे म्हणजेच मिथ्यात्व सोडणें ?

पिता – होय बरोबर ! आपल्या आत्म्याला यथार्थ समजणे म्हणजेच मिथ्यात्व सोडणे होय, जेव्हा हा जीव आपल्या आत्म्याला ओळखतो तेव्हाच बाकीची पापेही सुटू लागतात !

पुत्र – जीवाला त्रास देणे, मारणे, त्याचे मन दुखविणे हीच हिंसा आहे ना ?

पिता– होय ! बाळ जग तर केवळ यालाच हिंसा समजते, परंतु आपल्या आत्म्यात जे मोह-राग-द्वेष उत्पन्न होतात. तीही हिंसा आहे याची जाणीव मात्र त्यांना मुळीच नाही.

पुत्र – आँ ! तर मग क्रोध करण आणि लोभ करणे वगैरे देखील हिंसा होईल ?

पिता– कषायभाव हिंसाच आहेत. कषाय अर्थात् मोह-राग-द्वेष यांना 'भावहिंसा' म्हणतात. दुसऱ्यांना त्रास देणे, वगैरेंना 'द्रव्यहिंसा' म्हणतात.

पुत्र – जसे पाहिले असेल, जाणले असेल किंवा जसे ऐकले असेल तसे न बोलणे हे असत्य आहे. यामध्ये सत्य समजण्याची काय जरुरी आहे ?

पिता– जसे पाहिले असेल, जाणले असेल किंवा जसे ऐकले असेल तसे न बोलता वेगळेच (विपरीत) बोलणे हे तर असत्य आहेच. त्याचबरोबर हेही लक्षात घेणे जरूर आहे की जोपर्यंत आम्ही कोणत्याही गोष्टीबद्दल यथार्थ जाणून घेणार नाही, तोपर्यंत आमचे बोलणे सत्य कसे ठरेल ?

पुत्र – जसे पाहिले, जाणले व ऐकले तसे बोलावे बस !

पिता– नाही बाळ ! एवढ्यावर नाही भागणार. समजा, आम्ही कोणा अज्ञानीकडून ऐकले की, 'हिंसेमध्ये धर्म होतो' तर काय हिंसेमध्ये धर्म मानून घेणे सत्य होईल ?

पुत्र – वा ! ! हिंसेमध्ये धर्म सांगणे हे सत्य कसे मानता येईल ?

पिता– म्हणून तर म्हणतात सत्य बोलण्यापूर्वी सत्य काय आहे हे जाणून घेणे जरूर आहे.

पुत्र – दुसऱ्या कोणाची वस्तू चोरणे यालाच चोरी म्हणावयाचे ना?

पिता – होय, कोणाची पडलेली, विसरलेली अथवा ठेवलेली वस्तू त्याच्या परवानगी शिवाय उचलून घेणे अथवा उचलून दुसऱ्यास देणे ही तर चोरी आहेच ! शिवाय पर-वस्तूचे ग्रहण न झाले, केवळ पर-वस्तू ग्रहण करण्याचा भाव जरी झाला, तरी तो भाव देखील चोरी आहे.

पुत्र – हे तर समजले ! पण हे कुशीलचे काय प्रकरण आहे ? लोक म्हणतात की दुसऱ्यांच्या आई-बहिणींना वाईट दृष्टीने पाहणे कुशील आहे. वाईट दृष्टी म्हणजे काय ?

पिता – मनामध्ये विषय-वासना असणें म्हणजे वाईट दृष्टी असणें होय. येवढेच आता समजून घ्यावे.

पुत्र – गैरवाजवी, धन-संपत्ती जोडणे हाच परिग्रह आहे ना ?

पिता – बाळ, पैसा-घरदार आदींचा संग्रह करणें हा तर परिग्रह आहेच, परंतु त्यांचा संग्रह करण्याचा भाव असणें तसेच धन-संपत्तीविषयी रागभाव अर्थात् ममत्व परिणाम असणें आणि त्यांना आपले मानणे हा देखील परिग्रह आहे. या प्रकारच्या विपरीत मान्यतेला मिथ्यात्व म्हणतात.

पुत्र – असं ! मिथ्यात्व परिग्रह आहे ?

पिता – होय ! होय ! ! चोवीस प्रकारच्या परिग्रहात तर सर्वप्रथम त्याचेच नाव येते. नंतर क्रोध-मान-माया-लोभादि कषायांचे.

पुत्र – तर मग काय कषाय देखील परिग्रह आहेत ?

पिता – होय ! होय ! ! आहेतच ! कषायभाव हिंसाही आहेत, व परिग्रह देखील आहेत. वास्तविक तर सर्व पापांचे मूळ हे मिथ्यात्व आणि कषायच आहेत.

पुत्र – याचा अर्थ तर असा झाला की, पापांपासून बचाव होण्यासाठी प्रथम मिथ्यात्व आणि कषाय सोडले पाहिजेत असेच ना ?

पिता – बाळ ! खरोखरच तू फार समजूतदार आहेस ! खरी बाब तुझ्या लक्षात फार लवकर आली. जे जीवाला कुमार्गाला लावते त्यालाच तर पाप म्हणतात. एका प्रकारे दु:खाचे कारण असणारे वाईट कामच पाप आहे, मिथ्यात्व आणि कषाय ही वाईट काम आहेत म्हणून ती पाप आहेत.

**प्रश्न –**

१. पापे किती आहेत ? नावे सांगा.
२. जीव घोर पाप का करतो ?
३. सत्य समजल्याशिवाय सत्य बोलणे शक्य आहे काय ? –युक्तीपूर्वक उत्तरे द्या !
४. कषाय हे परिग्रह आहे का ? स्पष्ट करा !
५. द्रव्यहिंसा आणि भावहिंसा कशास म्हणतात.
६. पापापासून बचाव व्हावा यासाठी काय केले पाहिजे ?
७. सर्वात मोठे पाप कोणते व का ? हे सांगा !

## पाठात आलेली सूत्रात्मक सिद्धांत-वाक्ये

१. दु:खाचे कारण असलेले वाईट कामच 'पाप' आहे.
२. मिथ्यात्व आणि कषाय दु:खाचे कारण असल्यामुळे पाप आहेत.
३. सर्वात मोठे पाप मिथ्यात्व आहे.
४. मिथ्यात्वाला वश होवून जीव घोर पाप करतो.
५. मिथ्यात्व सुटल्याशिवाय संसाराचे परिभ्रमण सुटत नाही.
६. विपरीत मान्यतेला 'मिथ्यात्व' म्हणतात.
७. सत्य गोष्ट समजून घेणे व त्याप्रमाणे मानणे म्हणजे मिथ्यात्व सोडणे आहे.
८. आत्म्यामध्ये मोह-राग-द्वेष उत्पन्न होतात हीच भावहिंसा आहे. दुसऱ्याला त्रास देणे, मारणे वगैरे द्रव्यहिंसा आहे.
९. सत्य बोलण्यापूर्वी सत्य समजून घेणे आवश्यक आहे.
१०. मिथ्यात्व आणि कषाय अंतरंग परिग्रहाचे भेद आहेत.
११. सर्व पापाचे मूळ मिथ्यात्व आणि कषायच आहेत.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठ तिसरा

# कषाय

सुबोध – दादा ! आपण तर म्हणत होता की आत्मा फक्त जाणतो आणि पाहतो, परंतु आत्मा क्रोध करीत नाही काय ? माया-कपट करीत नाही काय ?

प्रबोध – हो ! हो ! का करीत नाही ? (करतोच) परंतु जसा आत्म्याचा स्वभाव जाणणे-पाहणे आहे, तसा आत्म्याचा स्वभाव क्रोध-आदी करणे नाही. कषाय तर त्याचा विभाव आहे, स्वभाव नाही.

सुबोध – दादा ! विभाव म्हणजे काय ?

प्रबोध – आत्म्याच्या स्वभावाच्या विपरीत भावास 'विभाव' म्हणतात. आनंद आत्म्याचा स्वभाव आहे. मिथ्यात्व, राग-द्वेष (कषाय) आनंद स्वभावाच्या विपरीत आहेत, म्हणून ते 'विभाव' आहेत.

सुबोध – दादा ! राग-द्वेष म्हणजे काय ?

प्रबोध – जेव्हा आम्ही एखाद्याला भला असे समजून त्याची इच्छा करू लागतो तेव्हा त्यास 'राग' म्हणतात. आणि जेव्हा एखाद्याला वाईट समजून दूर करू इच्छितो तेव्हा त्यास 'द्वेष' म्हणतात.

सुबोध – आणि कषाय ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

प्रबोध – रात्रंदिवस तर कषाय करता आणि इतकेही नाही जाणत की ती काय वस्तू आहे ? कषाय राग-द्वेषाचेच दुसरे नाव आहे. जे आत्म्याला कसतात अर्थात् दुःख देतात त्यांनाच कषाय म्हणतात. एका प्रकारे आत्म्यामध्ये उत्पन्न होणारे राग-द्वेषरूप विकारच कषाय आहेत अथवा ज्यामुळे संसाराची प्राप्ती होते तेच कषाय होत.

सुबोध – कषाय किती आहेत ?

प्रबोध – कषाय चार प्रकारचे आहेत. क्रोध, मान, माया आणि लोभ.

सुबोध – बरं ! तर मग आम्ही एखाद्यावर रागावतो त्यालाच क्रोध म्हणत असतील ?

प्रबोध – होय बाळ ! हा क्रोध फार दुःखद आहे.

सुबोध – तर मग आम्हाला क्रोध येतोच का ?

प्रबोध – मुख्यतया जेव्हा आपण असे मानतो की, 'त्याने माझे वाईट केले' तेव्हा आत्म्यामध्येच त्याचे विषयी क्रोध उत्पन्न होतो. त्याचप्रमाणे जेव्हा आम्ही असे मानतो की, 'जगातील इतर पदार्थ माझे आहेत अन् मी त्यांचा स्वामी आहे', तेव्हा त्याविषयी मान उत्पन्न होतो.

सुबोध – मान म्हणजे काय ?

प्रबोध – घमेण्ड (गर्व) करणे म्हणजेच 'मान' होय. लोक म्हणतातच की, हा फार घमेंडखोर आहे. याला आपल्या धन संपत्तीचो आणि शक्तीची खूपच घमेंड आहे. पसा-अडका शरीरादी बाह्य-पदार्थ हे तर टिकणारे नाहीतच, आम्ही व्यर्थच यांचा गर्व करतो.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

सुबोध – काही लोक खूपच छल-कपट करतात !

प्रबोध – होय बाळ ! तोही तर कषाय आहेच ! त्यालाच 'माया' म्हणतात; मायाचारी मरून पशू होतात. मायाचारी जीवांच्या मनात असते काही वेगळच, तो बोलतो काही वेगळेच आणि करतो त्यापेक्षा निराळेच, लोभी जीव छल-कपट फार करतात.

सुबोध – दादा ! या लोभ-कषाया बाबतही काही सांगा ना !

प्रबोध – हा फार भयंकर कषाय आहे, याला तर 'पापाचा-बाप' म्हणतात. कोणतीही वस्तू पाहिली की ही मला मिळावी असे लोभी जीवाला नेहमी वाटत असते.

सुबोध – कषाय वाईट आहेत हे ठीक आहे पण माझा प्रश्न हा आहे की, हे उत्पन्नच का होतात व दूर कसे होतील ?

प्रबोध – मिथ्यात्वामुळे (विपरीत मान्यतेमुळे) परपदार्थ एक तर इष्ट (अनुकूल) वा अनिष्ट (प्रतिकूल) वाटतात, मुख्यतः यामुळेच कषाय उत्पन्न होतात. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळे जेव्हा परपदार्थ इष्ट वा अनिष्ट भासणार नाहीत तेव्हा मुख्यतः कषाय पण उत्पन्न होणार नाहीत.

सुबोध – ठीक मग आम्हाला तत्त्वज्ञान प्राप्त करण्याचा अभ्यास केला पाहिजे. त्यामुळेच कषाय मिटतील, असेच ना ?

प्रबोध – अगदी खरे ! खरी गोष्ट तर हीच आहे.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

**प्रश्न –**

१. कषाय कशास म्हणतात ? कषायाला विभाव का म्हटले आहे ?
२. कषायापासून काय नुकसान आहे ?
३. कषाय आत्म्याचा स्वभाव आहे काय ?
४. कषाय किती आहेत ? नावे सांगा.
५. कषाय का उत्पन्न होतात व ते कसे दुर होतील ?
६. आत्म्याचा स्वभाव काय आहे ?

## पाठात आलेली सूत्रात्मक सिद्धांत-वाक्ये

१. जो आत्म्याला कसतो अर्थात् दुःखी करतो त्याला 'कषाय' म्हणतात.
२. 'कषाय' राग-द्वेषाचे दुसरे नाव आहे.
३. कषाय आत्म्याचा विभाव आहे, स्वभाव नाही.
४. जाणणे, पाहणे [ज्ञान-दर्शन] आत्म्याचा स्वभाव आहे.
५. दुसऱ्यावर रागावणे याला 'क्रोध' म्हणतात.
६. घमेण्ड [गर्व] करणे यास 'मान' म्हणतात.
७. छल-कपट करणे यास 'माया' म्हणतात.
८. एखादी वस्तु पाहून ती प्राप्त करण्याची इच्छा होणे यास 'लोभ' म्हणतात.
९. मुख्यत: मिथ्यात्वामुळे परपदार्थ इष्ट-अनिष्ट भासतात आणि त्यामुळे कषाय उत्पन्न होतात.
१०. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळे जेव्हा परपदार्थ इष्ट वा अनिष्ट भासणार नाहीत तेव्हा मुख्यत: कषाय सुद्धा उत्पन्न होणार नाहीत.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## पाठ चवथा

# सदाचार

### बाल-सभा

[ चवथ्या वर्गातील मुलांची एक सभा सुरू आहे. मुलांपैकीच एकाला अध्यक्ष केलेले आहे. तो खुर्चीवर बसलेला आहे. ]

अध्यक्ष – (उभे राहून) आता आपणासमोर शान्तिलाल एक गोष्ट सांगतील.

शान्तिलाल – (टेबलाजवळ उभे राहून)

माननीय अध्यक्ष महाराज तसेच वर्ग बंधूंनो आणि-भगिनींनो !

अध्यक्ष महाराजांच्या आज्ञेनुसार आता मी आपणाला एक बोधप्रद कथा सांगतो. आपण शांतीपूर्वक ऐकाल अशी आशा करतो.

एक मुलगा फार हट्टी होता. तो खाण्या–पिण्याचा देखील फार लोभी होता. जेव्हा पहावे तेव्हा आपल्या घरी तो थोड्याशा गोष्टीसाठी आपल्या बहिण–भावांशी भांडत असे. त्याची आई त्याला खूप समजावून सांगे, परंतु तो ऐकत नसे.

एके दिवशी त्याच्या घरी मिठाई केली. आईने सर्व मुलांना सारखी वाटली. सर्वजन मिठाई घेऊन आनंदाने खाऊ लागले, परंतु तो म्हणू लागला,



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

"माझा लाडू लहानसा आहे," तो पर्यंत इतर मुलांनी लाडू खाऊन सुद्धा टाकले होते. नाहीतर बदलूनही दिला असता. तो क्रोधी तर होताच जोर-जोराने रडू लागला आणि रागा-रागाने लाडू देखील फेकून दिला आणि आपण एका कोपऱ्यात जाऊन बसला. दिवसभर जेवलाही नाही. सर्वांनी पुष्कळ समजाऊन सांगितले. परंतु स्वभावतःच घमेण्डखोरही होता ना ? मग तो ऐकतो कशाला !

कोपऱ्यात एक विंचूही होता तो त्याला चावला. त्याला आपल्या करणीची शिक्षा मिळाली. दिवसभर उपाशी राहिला, लाडूही गेला. आणि विंचू चावला ते वेगळेच. क्रोधी, मानी, लोभी आणि हट्टी मुलांची अशीच दुर्दशा होत असते, म्हणूनच आपणही क्रोध, मान, लोभ व हट्ट करावयास नको.


इतके बोलून मी आपली जागा घेतो.

(टाळ्यांचा कडकडाट)

अध्यक्ष – [उभे राहून] शान्तिलालने फार बोधप्रद गोष्ट सांगितली. आता मी निर्मला ताईंना विनंती करतो की त्यांनीही एखादी बोधप्रद गोष्ट सांगावी.

निर्मला – (टेबलाजवळ उभे राहून)

आदरणीय अध्यक्ष महाराज आणि बंधु भगिनींनो ! मी आपल्यासमोर व्याख्यान देण्यासाठी आलेली नाही. मी वर्तमानपत्रात कालच एक गोष्ट वाचली होती तीच सांगू इच्छिते.



एका गावात लग्नाची एक वरात आली होती. वराती साठी रात्री स्वयंपाक चालू होता. अंधारात कुणाला दिसले नाही, परंतु योगायोगाने एक साप भाजीत पडला. रात्रीची जेवणे झाली. सर्व वरातींनी भोजन केले, परंतु पाच जण म्हणाले 'आम्ही रात्री जेवत नसतो.' सर्वांनी त्यांची खूपच टिंगल केली 'हे मोठे धर्मात्मा लागून गेले ? रात्री उपाशी राहतील तर जणू सरळ स्वर्गालाच पोहचतील.' परंतु झाले असे की, भोजन करताच लोक बेशुद्ध होऊ लागले. दुसऱ्यांना स्वर्गाला पाठविणारे स्वतःच स्वर्गाला जाण्याची तयारी करू लागले. परंतु ताबडतोब ह्या पाच माणसांनी त्यांना दवाखान्यात पोहोचविले. तेथे मोठ्या कष्टाने अर्ध्यांना वाचविणे शक्य झाले. जर यांनीही रात्री खाल्ले असते तर एकही जण वाचला



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

नसता. या करिता कोणीही रात्री भोजन करावयास नको. इतके बोलून मी आपली जागा घेतो.

एक विद्यार्थी – (आपल्या जागेवरच उभे राहून)

का हो निर्मलाताई ! रात्री खाण्यात एवढाच दोष आहे का आणखी काही !

अध्यक्ष – (आपल्या जागेवर उभे राहून)

आपण अगोदर आपल्या जागेवर बसा बघू. आपणाला सभेत कसे वागावे हेही माहीत नाही काय ? सभेत असे मध्येच बोलावयास नको, एवढेही आपणास समजत नाही काय ? एखादे अत्यंत आवश्यक काम जरी असले तरी अध्यक्षांची परवानगी घेवून नंतरच बोलावयास पाहिजे.

आता प्रश्न निघालाच आहे म्हणून मी निर्मला-ताईंना विनंती करतो की, इच्छा असल्यास त्यांनी याचे उत्तर द्यावे.

निर्मला – (उभे राहून) हा तर मी रात्री–भोजणामुळे होणाऱ्या व प्रत्यक्ष समोर दिसणाऱ्या हानीकडे केवळ इशारा केला आहे परंतु वास्तविक रात्री भोजनामध्ये (लोलुपता) लालसा अधिक असल्यामुळे रागाची (कषायाची) तीव्रता असते म्हणून ते आत्मसाधने-मध्ये देखील बाधक आहे.

अध्यक्ष – (उभे राहून) निर्मलाताईंनी फारच चांगली गोष्ट सांगितली आहे. आम्ही सर्वांनी आता हाच निश्चय केला पाहिजे की, आजपासून आम्ही रात्री खाणार नाही. पुष्कळ जणांची अजून, बोलण्याची इच्छा दिसते



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

परंतु आज वेळ फार झाला आहे, आता त्यांनी क्षमा करावी. त्यांचे भाषण आपण पुढच्या सभेत ऐकू. मी आता काय भाषण देऊ? परंतु एक गोष्ट सांगण्याची इच्छा आहे,

मी आठ दिवसापूर्वीच वडीलांबरोबर कलकत्त्याला गेलो होतो. तेथं वैज्ञानिक प्रयोगशाळा पाहिली. तेथे मी स्वत: आपल्या डोळ्याने पाहिले की, जे पाणी आपल्याला स्वच्छ दिसते, ते दुर्बीणीने पाहिले असता त्यामध्ये लाखो जीव दिसून येतात.

म्हणून मी तर प्रतिज्ञा केली की, आता न गाळलेले पाणी कधीही पिणार नाही. मी आपणा सर्वांना सुद्धा विनंती करू इच्छितो की, यापुढे आपण सर्वांनी सुद्धा पाणी गाळूनच पिण्याचा निश्चय करावा. इतके बोलून मी आजची सभा समाप्त झाल्याचे जाहीर करतो.

[जय बोलो महावीर भगवान की जय अशा जय-जयकारात सभा समाप्त होते.]

**प्रश्न –**

१. क्रोध करणे का वाईट आहे ?
२. हट्टी बालकाची गोष्ट आपल्या शब्दात लिहा.
३. रात्री भोजन करण्यात काय नुकसान आहे ?
४. पाणी गाळून का प्यावे ?
५. सभा संचालनाची पद्धत आपल्या शब्दात लिहा.

卐



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ पाचवा

# गती

पुत्र – बाबा ! आज मी मंदिरामध्ये ऐकले होते की, **"चारों गति के माँही प्रभु दु:ख पायो मैं घणों"** ज्यामध्ये दु:खच दु:ख आहे अशा या चार गती काय आहेत ?

पिता – बाळ ! जीवाच्या अवस्था – विशेषाला 'गती' म्हणतात संसारामध्ये जीव सामान्यपणे चार अवस्थेत पाहावयास मिळतात, त्यांनाच चार गती म्हणतात. जेव्हा हा जीव आपल्या आत्म्याला ओळखतो व आत्म्याची साधना करतो तेव्हा तो चतुर्गतीच्या दु:खापासून मुक्त होतो आणि आपले अविनाशी सिद्धपद प्राप्त करतो. या सिद्धपदाला पंचम गती म्हणतात.

पुत्र – त्या चार गती कोणकोणत्या आहेत ?

पिता – मनुष्य, तिर्यञ्च, नरक आणि देव.

पुत्र – आम्ही तुम्हीही मनुष्यच आहोत ना ?

पिता – आम्ही मनुष्यगतीमध्ये आहोत म्हणून मनुष्य म्हटले जातो. वास्तविक आम्ही तुम्ही आत्मा (जीव) आहोत.



मनुष्यगती

जेव्हा जीव कोण्या एका ठिकाणी मरतो व मनुष्य गतीमध्ये जन्म घेतो, अर्थात् मनुष्य शरीर धारण करतो तेव्हा त्याला मनुष्य म्हणतात.

पुत्र – ठीक ! हे तर लक्षात आले की आम्ही मनुष्य गतीचे जीव आहोत. परंतु गाय, म्हैस, घोडा वगैर जीव कोणत्या गतीचे आहेत ?



तिर्यञ्चगती

पिता – हे सर्व तिर्यञ्च गतीचे जीव आहेत. पृथ्वी, पाणी, अग्नि, हवा आणि वनस्पती तसेच कीडे, मुंग्या, मुंगळे, हत्ती, घोडे, कबूतर, मोर इत्यादी पशु–पक्षी जे तुम्हाला दिसतात. ते सर्व तिर्यञ्च गतीमधील जीव होत.

जेव्हा कोणी जीव मरून यांच्यात जन्म घेतो. तेव्हा त्याला तिर्यञ्च म्हटले जाते.

पुत्र – जर मनुष्या शिवाय इतर दिसणारे सर्व जीव तिर्यञ्च आहेत तर मग नारकी कोण आहेत ?



नरकगती

पिता – या पृथ्वीच्याखाली सात नरक आहेत. तेथील वातावरण अत्यंत दुःखदायी आहे. काही भागात शरीराला जाळून



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

टाकणारी भयंकर उष्णता आहे तर काही ठिकाणी शरीराला गोठून टाकणारी भयंकर थंडी आहे. अन्न-पाण्याचा पूर्ण अभाव आहे. तेथील जीवांना भयंकर भूक-तहानेची वेदना सहन करावी लागते. ते जीव तीव्र कषायीसुद्धा असतात. आपआपसात भांडत राहतात, परस्परामध्ये भयंकर मारामारी नेहमी चालू असते.

जे जीव मरून अशा संयोगात जन्म घेतात. त्यांना नारकी म्हणतात

पुत्र – आणि देव ?

पिता – ज्या प्राण्यांचे ज्याप्रमाणे भाव असतात, त्याप्रमाणे त्यांना फळही मिळते. त्यांना त्यांचे फळ मिळावे अशी ठिकाणेही असतात ( आहेत ). ज्याप्रमाणे पापाचे फळ भोगण्याचे ठिकाण नरकादी गती आहे, त्याचप्रमाणे जो जीव पुण्यभाव करतो त्याचे फळ भोगण्याचे ठिकाण देवगती आहे देवगतीमध्ये जीवांना मुख्यत: भोग-सामुग्रीची विशेषता असते.


देवगती

जे जीव मरून देवगतीमध्ये जन्म घेतात त्यांना देवगतीचे जीव म्हणतात.

पुत्र – यापैकी चांगली गती कोणती ?

पिता – बाळ ! आताच आपण पाहिले की चारही गतीमध्ये दु:खच दु:ख आहे. तर मग कोणतीही गती चांगली कशी म्हणता येईल ? या चारही गती संसार आहेत. चारही गतींचा अभाव करून जे मुक्त झाले आहेत ते सिद्ध

जीव पंचमगतीचे आहेत. केवळ एकमात्र सिद्धगतीच पूर्ण आनंदमय आहे.

पुत्र – मनुष्यगतीला तर चांगली म्हणावयास काय हरकत आहे ? कारण तीमधूनच मोक्षपद मिळते.

पिता – जर ही गती चांगली असती तर सिद्ध जीवांनी हिचाही परित्याग का केला असता ? म्हणून चतुर्गतीचे परिभ्रमण सोडणच चांगले आहे.

पुत्र – जर या गतीमधील परिभ्रमण सोडणेच चांगले आहे तर हा जीव या गतीमध्ये फिरतोच का ?

पिता – जर कोणी अपराध करील तर त्याची शिक्षा त्याला भोगावीच लागेल.

पुत्र – कोणत्या अपराधाने कोणत्या गतीची प्राप्ती होते ?

पिता – पुष्कळ आरंभ करण्याचा व पुष्कळ परिग्रह ठेवण्याचा भावच असा अपराध आहे की, ज्यामुळे जीवाला नरकात जावे लागते तसेच भावामधील कुटिलपणा अर्थात् मायाचार, लबाडी, फसवेगिरी तिर्यञ्च आयुच्या बंधाचे कारण आहेत.

पुत्र – आणि मनुष्य व देव यांच्यासाठी ?

पिता – अल्प आरंभ आणि अल्प परिग्रह ठेवण्याचा भाव तसेच स्वभावाची सरलता मनुष्यायूंच्या बंधाचे कारण आहेत. त्याचप्रमाणे संयम भावाबरोबर राहणारा शुभभावरूप रागांश आणि असंयमांश मंद कषायरूप भाव तसेच अज्ञानपूर्वक केलेल्या तपश्चरणाचे भाव हे सर्व देवायूच्या बंधाचे कारण आहेत.

पुत्र – वरील सर्व भाव बंधाचे कारण असल्यामुळे अपराधच आहेत, तर मग निरपराध दशा कोणती ?

पिता – एक वीतराग भावच निरपराध दशा आहे, म्हणून तो वीतराग भावच मोक्षाचे कारण आहे.

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

पुत्र – या सर्वांना जाणण्यापासून लाभ काय ?

पिता – आमच्या लक्षात येईल की, चारही गतीमध्ये दुःखच दुख आहे, सुख नाही. चतुर्गती भ्रमणाचे कारण शुभाशुभभाव आहेत, त्यातून सुटण्याचा उपाय एकमात्र वीतरागभाव आहे. आम्हाला वीतरागभाव प्राप्त करण्यासाठी ज्ञान-स्वभावी आत्म्याचा आश्रय घेतला पाहिजे.

**प्रश्न –**

१. गती कशास म्हणतात ? त्या किती प्रकारच्या आहेत ?
२. तिर्यञ्चगती कशास म्हणतात ?
३. नरकगतीतील वातावरणाचे वर्णन करा ? अशी कोणती कारणे आहेत की ज्यामुळे जीव नरकगतीला प्राप्त होतो ?
४. देवगतीमध्येही सुख नाही काय ? कारण सहित उत्तर द्या.
५. सर्वात चांगली गती कोणती आहे ? युक्तिपूर्वक उत्तर द्या.

## पाठात आलेली सूत्रात्मक सिद्धांत-वाक्ये

१. जीवाच्या अवस्था-विशेषाला 'गती' म्हणतात.
२. जीव कोठून तरी मरून मनुष्य-शरीर धारण करतो. तेव्हा त्यास 'मनुष्यगती' म्हणतात.
३. जीव कोठून तरी मरून तिर्यञ्च शरीर धारण करतो. त्यास 'तिर्यञ्चगती' म्हणतात.
४. जीव कोठून तरी मरून नारकी-शरीर धारण करतो त्यास 'नरकगती' म्हणतात.
५. जीव कोठून तरी मरून देव-शरीर धारण करतो तेव्हा त्यास 'देवगती' म्हणतात.
६. जीव आपल्या आत्म्याला ओळखून आत्मसाधनेद्वारा चतुर्गतीच्या दुःखातून मुक्त होऊन सिद्धपद प्राप्त करतो, तेव्हा त्यास 'पंचमगती' म्हणतात
७. एक वीतराग भावच पंचमगतीचे कारण आहे. वीतराग भाव प्राप्त करण्यासाठी ज्ञानस्वभावी आत्म्याचा आश्रय घेतला पाहिजे.

—ॐ—



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# पाठ सहावा | द्रव्य

विद्यार्थी – गुरुजी ! आई म्हणत होती की, आम्हाला जे दिसते ते सर्व पुद्गल आहे. पण पुद्गल म्हणजे काय ?

शिक्षक – बरोबर आहे. आम्हाला डोळ्याने फक्त वर्ण (रंग) च दिसतो आणि वर्ण फक्त पुद्गलातच असतो.
ज्यामध्ये स्पर्श, रस, गंध आणि वर्ण असतात त्यास 'पुद्गल' म्हणतात. पुद्गल अजीव द्रव्य आहे.

विद्यार्थी – द्रव्य कशास म्हणतात ? ते किती प्रकारचे आहेत ?

शिक्षक – गुणांच्या समूहाला द्रव्य म्हणतात. ते सहा प्रकारचे आहेत. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल.

विद्यार्थी – तर अजीव द्रव्य नाही काय ?

शिक्षक – जीव सोडून बाकीची सर्व द्रव्ये अजीवच तर आहेत. ज्यामध्ये ज्ञान असते तेच जीव होत, बाकी सर्व अजीवच तर आहेत.

विद्यार्थी – जर द्रव्य सहा प्रकारचे आहेत तर आम्हाला केवळ पुद्गल का दिसते ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

शिक्षक – कारण की इंद्रिय फक्त रूप, रस, आदिकांनाच जाणतात आणि आत्मा आदी वस्तु अरूपी आहेत, म्हणून इंद्रिय त्यांच्या ज्ञानात निमित्त नाहीत.

विद्यार्थी – पूजा-पाठ करणे इत्यादींना, धर्मद्रव्य म्हणत असतील आणि हिंसादिकांना अधर्म द्रव्य ?

शिक्षक – नाही बाळ ! हे धर्म आणि अधर्म अगदीच वेगळे पदार्थ आहेत. धर्म, अधर्म ही तर द्रव्यांची नावे आहेत आणि ती सर्व लोकात (विश्वात) तिळातील तेलाप्रमाणे व्यापून आहेत.

विद्यार्थी – यांच्या व्याख्या काय आहेत ?

शिक्षक – ज्याप्रमाणे पाणी माशांना चालण्यास निमित्त आहे, त्याचप्रमाणे स्वयं गमन करणाऱ्या जीव आणि पुद्‌गलांना गमन करण्यास जे निमित्त आहे तेच धर्मद्रव्य होय. तसेच ज्याप्रमाणे वृक्षाची छाया वाटसरूस थांबण्यास निमित्त आहे त्याचप्रमाणे गतिपूर्वक स्थिर होणाऱ्या जीव आणि पुद्‌गलांना स्थिर होण्यास जे निमित्त आहे तेच अधर्मद्रव्य आहे.

विद्यार्थी – एखादे वेळी जीवांना जर धर्मद्रव्य चालवू पाहील आणि अधर्मद्रव्य थांबवू पाहील तर मोठे अडचणीचे होईल ?

शिक्षक – ते चालवतात किंवा थांबवतात असे थोडेच आहे. जेव्हा जीव आणि पुद्‌गल स्वयं चालतात किंवा थांबतात (गमन करतात अथवा स्थिर होतात) तेव्हा केवळ ते निमित्त होतात.

विद्यार्थी – आकाश तर निळे-निळे स्पष्ट दिसतेच की, त्याला काय समजायचे ?

शिक्षक – नाही ! आताच तुम्हाला सांगितले होते की, निळेपणा, पिवळेपणा हे तर पुद्‌गलाचे पर्याय आहेत. आकाश तर अरूपी आहे. त्यात कोणताच रंग नसतो. जे सर्व द्रव्यांच्या राहण्यात निमित्त होते तेच आकाशद्रव्य आहे.

विद्यार्थी – आकाश तर वर आहे ना ?

शिक्षक – ते तर सर्वत्र आहे, वर खाली आणि आजु बाजूला सर्वत्र आहे. विश्वात अशी एकही जागा नाही की जेथे आकाश नाही. सर्व द्रव्य आकाशातच आहेत.

विद्यार्थी – काल तर वेळेलाच म्हणतात ना ? की आणखी काही आहे ?

शिक्षक – कालाचे दुसरे नाव 'समय' देखील आहे, परंतु काल देखील जीव पुद्‌गलाप्रमाणे एक स्वतंत्र द्रव्य आहे. त्याच्यात प्रतिसमय जी अवस्था होते तिचे नाव 'समय' आहे. हे कालद्रव्य जगातील पदार्थांच्या परिणमनात निमित्त असते.

विद्यार्थी – ठीक ! तर ही द्रव्ये एकंदर किती आहेत ?

शिक्षक – धर्म, अधर्म आणि आकाश तर एक एकच आहेत, परंतु कालद्रव्य असंख्य आहेत. जीवद्रव्य अनंत आहेत. पुद्‌गल द्रव्य जीवांच्या अनंत पट अर्थात् अनंतानंत आहेत.

विद्यार्थी – या द्रव्याशिवाय आणखी काहीच नाही का या जगात ?

शिक्षक – जग या द्रव्याशिवाय दुसरे काही नाहीच. सहा द्रव्यांच्या समूहाला विश्व म्हणतात आणि विश्वालाच जग म्हणतात.

विद्यार्थी – गुरुजी या विश्वाला कोणी बनविले ?

शिक्षक – हे तर अनादि-अनंत स्वनिर्मित आहे. याला बनविणारा कोणीही नाही.

विद्यार्थी – मग भगवान कोण आहे ?

शिक्षक – भगवान विश्वाला जाणणारा आहे, बनविणारा नाही जो तीन लोक आणि तीन कालातील संपूर्ण पदार्थांना एकाचवेळी एकदम जाणतो तोच भगवान आहे.

विद्यार्थी – शेवटी जगामध्ये जी धडामोड चालते तिचा कर्ता कोणी तरी असेल ना ?

शिक्षक – प्रत्येक द्रव्य आपापल्या पर्यायाचा कर्ता आहे. एक द्रव्य दुसऱ्याचा कर्ता नाही, अशी अनंत स्वतंत्रता द्रव्याच्या स्वभावात सामावलेली आहे. तिला जो ओळखतो तोच पुढे स्वयं भगवान होतो.

**प्रश्न –**

१. द्रव्य कशास म्हणतात ? ते किती प्रकारचे आहेत ? नावे सांगा.
२. विश्व कशास म्हणतात ? याला बनविणारा कोण आहे ? भगवान काय करतात ?
३. प्रयेक द्रव्याची स्वतंत्र-स्वतंत्र संख्या लिहा.
४. व्याख्या लिहा.
धर्मद्रव्य; अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य, कालद्रव्य.
५. इंद्रियांनी लक्षात येणाऱ्या द्रव्यांचे वर्णन करा ?
६. आत्म्याचा स्वभाव काय आहे ? तो इन्द्रियांना का जाणला जाऊ शकत नाही ?
७. जीव आणि अरूपी द्रव्ये कोणती ते सांगा.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

# पाठात आलेली सूत्रात्मक सिद्धांत-वाक्ये

१. द्रव्याच्या समूहाला 'विश्व' म्हणतात.

२. हा लोक (हे विश्व) अनादि-अनंत स्वनिर्मित आहे.

३. गुणांच्या समूहाला 'द्रव्य' म्हणतात.

४. ज्यामध्ये स्पर्श, रस, गंध, वर्ण, आढळून येतात ते 'पुद्‌गल' होत.

५. ज्यामध्ये ज्ञान असते तो 'जीव' होय.

६. धर्मद्रव्य – स्वयं गमन करणाऱ्या जीव आणि पुद्‌गलांच्या गतीमध्ये निमित्त आहे.

७. अधर्मद्रव्य – गमनपूर्वक स्थिर होणाऱ्या जीव आणि पुद्‌गलांना स्थिर होणास निमित्त आहे.

८. आकाशद्रव्य – सर्व द्रव्यांना अवगाहनास निमित्त आहे.

९. काल द्रव्य – सर्व द्रव्यांच्या परिवर्तनात निमित्त आहे.

१०. सर्वद्रव्य आपापल्या पर्यायांचे कर्ता आहेत. कोणतेही द्रव्य परद्रव्याचा कर्ता नाही.

११. भगवान् ( ईश्वर ) लोकाला जाणणारा आहे, बनविणारा नाही

१२. जीव सोडून बाकीची पाच द्रव्ये अजीव आहेत.

१३. पुद्‌गलाशिवाय बाकीची पाच द्रव्ये अमूर्तिक ( अरूपी ) आहेत.

१४. इंद्रिये मूर्तिक ( रूपी ) पुद्‌गलाला जाणण्यास निमित्त होऊ शकतात, आत्म्याला जाणण्यास नाही.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

## पाठ सातवा

# भगवान महावीर



शिक्षक – मुलांनो ! उद्या महावीर जन्मकल्याणिक ( जयंती ) महोत्सव आहे प्रात:काळी प्रभात फेरी निघेल. म्हणून सकाळी पाच वाजता सर्वांनी यावयाचे आहे आणि ऐका ! सायंकाळी महावीर चौकात जाहीर सभा होईल. त्यात बाहेरून आलेले मोठे-मोठे विद्वान लोक भगवान महावीरासंबंधी भाषणे देतील, आपण सर्वजण तेथे अवश्य यावयास हवे.



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

विद्यार्थी – गुरुजी ! मोठ्या विद्वानांची भाषणे तर आम्हाला
(पहिला) समजत नाहीत. आपणच सांगा ना, भगवान महावीर कोण होते ? त्यांचा जन्म कोठे झाला होता ?

शिक्षक – मुलांनो ! भगवंताचा जन्म होत नसतो. भगवान बनत असतात. जन्म तर आजपासून २५०० वर्षापूर्वी चैत्र शुक्ल त्रयोदशीच्या दिवशी बालक वर्धमानचा झाला होता. नंतर तो बालक वर्धमानच आत्म-साधनेचा अपूर्व पुरुषार्थ करून भगवान महावीर झाला.

विद्यार्थी – याचा अर्थ असा झाला की, आमच्या मधूनही एखादा
(दुसरा) कोणी आत्मसाधना करून भगवान बनू शकतो ! तर काय वर्धमान जन्माचे वेळी आमच्या सारखेच होते ?

शिक्षक – होय ! अगदी असेच. ही गोष्ट निश्चित आहे की, ते प्रतिभाशाली, आत्मज्ञानी, विचारशील, पूर्ण निरोगी आणि विवेकी बालक होते. साहसही त्यांच्यात अपूर्व होते. कोणाला कधीकाळी भिणे हे तर त्यांना माहीतच नव्हते. म्हणूनच लोक त्यांना लहानपणा पासून वीर, अतिवीर म्हणू लागले होते.

विद्यार्थी – त्यांना सन्मति देखील म्हणतात ना ?
(तिसरा)

शिक्षक – होय ! त्यांनी आपल्या बुद्धीचा विकास करून पूर्णज्ञान प्राप्त करून घेतले होते, म्हणून त्यांना सन्मति देखील म्हणतात. आणि सर्वात बलवान राग-द्वेषरूपी अंतरंग शत्रूंनाही जिंकले होते म्हणून त्यांना महावीर असेही म्हणतात. त्यांची पाच नावे प्रसिद्ध आहेत – वीर, अतिवीर, सन्मति, वर्धमान आणि महावीर.

विद्यार्थी – त्यांच्या जन्मकल्याणिकाचे वेळी तर उत्सव साजरा
(पहिला) केला गेला असेलच ? आम्ही जर आजही उत्सव करतो तर त्यावेळेसचे काय सांगावे ?

शिक्षक – होय ? ते नाथवंशीय क्षत्रिय राजकुमार होते. त्यांच्या वडीलांचे नाव राजा सिद्धार्थ आणि मातेचे नाव त्रिशलादेवी होते त्यांनी तर उत्सव साजरा केलाच परंतु त्याशिवाय सर्व लोकांनी, एवढेच नव्हे तर स्वर्गातील देव व इंद्रादिकांनी देखील उत्सव साजरा केला होता.

विद्यार्थी – त्यांचाच जन्मोत्सव का साजरा करतात. इतरांचा
(दुसरा) का नाही ?

शिक्षक – महावीरांचा हा अन्तिम (शेवटचा) जन्म होता. त्यानंतर त्यांच्या जन्म-मरणाचा अभावच झाला. ते वीतराग आणि सर्वज्ञ बनले. जन्म घेणे काही चांगली गोष्ट नाही. परंतु ज्या जन्मात जन्म-मरणाचा अभाव होतो, आत्मा भगवान होतो तोच जन्म सार्थक आहे.

विद्यार्थी – छान ! तर आज जन्म-मरणाचा नाश करणाऱ्यांचा
(पहिला) जन्मोत्सव आहे म्हणायच !!

विद्यार्थी – गुरुजी ! आपण त्यांच्या माता-पित्याचे नाव सांगितले
(दुसरा) परंतु पत्नी आणि मुलांची नावे सांगितलीच नाहीत ?

शिक्षक – महावीरांनी लग्नच केलें नव्हते म्हणून पत्नी आणि मुलांचा प्रश्नच उभा होत नाही. त्यांचे माता-पिता प्रयत्न करून थकले, परंतु महावीरांना लग्न करण्यास ते तयार करू शकले नाहीत.

विद्यार्थी (तिसरा) – म्हणजे ते साधु झाले होते काय ?

शिक्षक – होय ! अगदी लोकोत्तम साधु ! साधु झाल्याशिवाय कोणी भगवान होऊच शकत नाही. ते तीस वर्षाच्या

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

भर तारुण्यामध्येच नग्न दिगंबर साधु झाले. त्यांनी घोर तपश्चरण केले. अखण्ड बारा वर्षांच्या आत्म-साधनेनंतर त्यांना केवलज्ञानाची (दिव्यज्ञानाची) प्राप्ती झाली.

विद्यार्थी – याचा अर्थ हा झाला की, ते ४२ वर्षाच्या वयात
(पहिला) केवलज्ञानी बनले होते.

शिक्षक – होय ! तद्नंतर त्यांचा सतत ३० वर्षेपर्यंत सर्व भारत भर समवशरण सहित विहार झाला व दिव्यध्वनीद्वारे तत्त्वांचा उपदेश होत राहिला. अंतिमसमयी पावापुरी येथे आत्म-ध्यानात मग्न भगवान महावीर वयाच्या ७२ व्या वर्षी दिवाळीचे दिवशी मोक्षाला प्राप्त झाले.

विद्यार्थी – पावापुर कोठे आहे ?
(दुसरा)

शिक्षक – पावापुर बिहारमध्ये नवादा रेल्वे स्टेशन जवळ आहे.

विद्यार्थी – गुरुजी ! सर्वत्र दीपावली साजरी करतात ती
(तिसरा) मरावीरांच्या मुक्ति-प्राप्तीचा आनंद प्रगट करण्या-साठीच ना ?

शिक्षक – होय ! होय ! ! दीपावली म्हणा अगर महावीर निर्वाणोत्सव; एकच आहे. त्याच दिवशी त्यांचे प्रमुख शिष्य इन्द्रभूति गौतम यांना केवलज्ञानाची प्राप्ती झाली. ते गौतम गणधर या नावाने प्रसिद्ध आहेत.

विद्यार्थी – गुरुजी ! भगवंतांचा उपदेश तीस वर्षेपर्यंत होत
(पहिला) राहिला त्यामध्ये त्यांनी काय काय सांगितले ?

शिक्षक – हे तर तुम्ही विस्ताराने रात्रीच्या सभेमध्ये विद्वानांच्या तोंडूनच ऐका. मी आता केवळ त्यांची दोन-चार उपदेश-वचने तेवढी सांगतो –



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates

१. सर्व जीवांचे आत्मे समान आहेत, कोणी लहान नाही, कोणी मोठा नाही.
२. भगवान कोणी वेगळे नसतात, जो पुरुषार्थ करतो तो भगवान बनू शकतो.
३. भगवान जगातील कोणत्याही पर-पदार्थांचे कर्ते-हर्ते नाहीत, ते केवळ जाणणारे (ज्ञायक) आहेत.
४. आमच्या आत्म्याचा स्वभाव देखील जाणणें आहे, कषाय आदि करणे नाही.
५. कधी कोणाचे मन दुखविण्याचा भाव करू नका.
६. खोटे बोलणें व खोटे बोलण्याचा भाव करणें पाप आहे.
७. चोरी करणे व चोरी करण्याचा भाव करणे पापकार्य आहे.
८. सर्वांनी संयमाने राहावे क्रोधापासून दूर असावे. अभिमानी नसावे.
९. छल-कपट करणे आणि परिणामात कुटिलता ठेवणे फार वाईट आहे.
१०. लोभी मनुष्य सदा दुःखी असतो.
११. आम्ही आपल्याच अपराधामुळे दुःखी आहोत आणि आपली चूक सुधारूनच सुखी होऊ शकतो.


**प्रश्न –**

१. भगवान महावीरांचा संक्षिप्त परिचय द्या.
२. महावीरांचा उपदेश काय होता ?
३. संक्षिप्त टिपणे लिहा :– दीपावली, महावीर-जयन्ती, पावापुर.
४. महावीरांची किती नावे आहेत ? ते सांगून प्रत्येकाची सार्थकता दाखवा.
५. त्यांचाच जन्म-दिवस का साजरा करावा ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

Version 001: remember to check http://www.AtmaDharma.com for updates



## पाठ आठवा

# जिनवाणी-स्तुती

सवैया – मिथ्यातम नाशवे को, ज्ञान के प्रकाशवे को,
आपा पर भासवे को, भानु सी बखानी है ।
छहों द्रव्य जानवे को, बन्ध विधि भानवे को,
स्व पर पिछानवे को, परम प्रमानी है ॥
अनुभव बतायवे को, जीव के जतायवे को,
काहू न सतायवे को, भव्य उर आनी है ।
जहाँ तहाँ तारवे को, पार के उतारवे को,
सुख विस्तारवे को, ये ही जिनवाणी है ॥

दोहा – हे जिनवाणी भारती, तोहि जपों दिन रैन ।
जो तेरी शरण गहे, सो पावे सुख चैन ॥
जा वाणी के ज्ञानतें, सुझे लोकालोक ।
सो वाणी मस्तक नवों, सदा देत हों ढोक ॥



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# [ जिनवाणी-स्तुतीचा भावार्थ ]

माते जिनवाणी ! साक्षात् सरस्वती !! तू मिथ्यात्वरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी, तसेच आत्मा व परमपदार्थांचे खरे ज्ञान करविण्यासाठी सूर्यासमान आहेस.

आई ! सहा द्रव्यांच्या स्वरूपाचे ज्ञान करविण्यासाठी कर्मांच्या बंध-पद्धतीचे नाश करविण्यासाठी, स्व-पराची खरी ओळख करविण्यासाठी तुझी प्रामाणिकता निःसंदेह आहे !

माते जिनवाणी ! म्हणूनच भव्य जीवांनी तुला आपल्या हृदयात धारण केले आहे. कारण की, तूच आत्मानुभूती करण्यासाठी, शुद्ध आत्म्याची प्रतीती करण्यासाठी तसेच कुणालाही दुःख न होवो, असा मार्ग दाखविण्यासाठी पुर्ण समर्थ आहेत.

आई ! केवळ एक तू जिनवाणीच संसारातून पार करण्यास समर्थ आहेस. तसेच खऱ्या सुखाच्या प्राप्तीचा मार्ग दाखविणारी आहेस.

माते ! जिनवाणी ! सरस्वती ! तुझे रात्रंदिवस सदासर्वदा स्मरण राहो ! जो तुझ्या आश्रयाला येतो तो सुनिश्चित खऱ्या अतींद्रिय सुखाला प्राप्त होतो.

आई ! तुझ्याच प्रसादाने संपूर्ण लोक व अलोकाचे खरे ज्ञान होते. माते जिनवाणी ! तुला माझे विनयपूर्वक सदासर्वदा नमन असो !

**प्रश्न –**

१. जिनवाणीची स्तुती लिहा.
२. स्तुतीमध्ये जे भाव प्रगट केले आहेत. ते आपल्या शब्दात लिहा.
३. जिनवाणी कोणास म्हणतात ?
४. जिनवाणीच्या आराधनेपासून काय लाभ आहे ?



Please inform us of any errors on rajesh@AtmaDharma.com

# हमारे यहाँ प्राप्त महत्त्वपूर्ण प्रकाशन

| | |
|---|---|
| समयसार/बृहज्जिनवाणी संग्रह/मोक्षशास्त्र | २०.०० |
| प्रवचनसार/अष्टपाहुड | २०.०० |
| प्रवचनरत्नाकर भाग १/आध्यात्मिक पाठ संग्रह | १२.०० |
| पण्डित टोडरमल : व्यक्तित्व और कर्तृत्व | ११.०० |
| नियमसार/पंचास्तिकाय/समयसार नाटक/भावदीपिका | १०.०० |
| मोक्षमार्गप्रकाशक/आ. कुन्दकुन्द और उनके टीकाकार | १०.०० |
| सिद्धचक्र विधान/प्रवचनरत्नाकर भाग २, ३, ४, एवं ५ | १०.०० |
| ज्ञानगोष्ठी/जिनेन्द्र अर्चना (पूजन संग्रह) | ७.०० |
| तीर्थंकर महावीर और उनका सर्वोदय तीर्थ (हि., गु., म., क., अं.) | ६.०० |
| सत्य की खोज [कथानक] (हि., गु., क., त.) | ६.०० |
| पुरुषार्थसिद्ध्युपाय/जिनवरस्यनयक्रम्/धर्म के दश लक्षण (हि., गु., म., अं.) | ६.०० |
| क्रमबद्धपर्याय (हि., गु., क., त., अं.)/अध्यात्म रत्नत्रय | ५.०० |
| बारह भावना : एक अनुशीलन/बनारसीविलास/अर्द्धकथानक | ५.०० |
| अध्यात्म संदेश/छहढाला/आचार्य कुन्दकुन्द और उनके पंच परमागम | ५.०० |
| बनारसीदास विशेषांक/वीतराग विज्ञान प्रशिक्षण निर्देशिका | ५.०० |
| श्रावक धर्म प्रकाश/भक्तामर प्रवचन/बनारसीदास (कामिक्स) | ५.०० |
| गागर में सागर/चौबीस तीर्थंकर पूजन/आप कुछ भी कहो | ४.०० |
| बालबोध पाठमाला भाग १, २, ३ का सेट | २.७० |
| वीतराग विज्ञान पाठमाला भाग १, २, ३ का सेट | ३.५० |
| तत्वज्ञान पाठमाला भाग १, २ का सेट | २.६५ |
| बनारसीदास : व्यक्तित्व व कर्तृत्व/चौसठ ऋद्धिविधान | ३.०० |
| चिद्विलास/परमार्थवचनिका | २.५० |
| णमोकार महामंत्र/विदेशों में जैनधर्म : उभरते पदचिन्ह | २.०० |
| जिनपूजन रहस्य | १.५० |
| मैं कौन हूँ/अहिंसा महावीर की दृष्टि में/भरतबाहुबली नाटक | १.२५ |
| बारहभावना (पद्य)/लघु जैन सिद्धान्त प्रवेशिका/कुन्दकुन्द शतक | १.०० |
| बनारसीदास : जीवन और साहित्य/विदेशों में जैनधर्म : बढ़ते कदम | १.०० |
| जिनेन्द्र वंदना और बारह भावना/णमोलोए सव्व साहूणं | १.०० |
| महावीर वन्दना/मैं ज्ञानानन्द स्वभावी हूँ (केलेन्डर) | ०.५० |
| गोम्मटेश्वर बाहुबली/अर्चना (पूजन संग्रह) | ०.४० |
| वीतरागी व्यक्तित्व : भगवान महावीर (हि., गु.) | ०.२५ |